# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः03.12.2024** **वारःमंगळवार**

1. संसदेचं कामकाज सुरळीत सुरू ठेवण्याच्या मुद्दयावर विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांची सहमती
2. भाजपा विधीमंडळ पक्षनेता निवडीसाठी विजय रुपाणी आणि निर्मला सीतारामन यांची केंद्रीय निरीक्षकपदी नियुक्ती; उद्या होणार विधिमंडळ पक्षाची बैठक
3. उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज राज्याच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर
4. 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी ज्येष्ठ नेते शरद पवार आणि
5. फेंजल चक्रीवादळाच्या प्रभावामुळे अनेक जिल्ह्यात ढगाळ हवामान, पिकाचं नुकसान होण्याची शक्यता

**बिर्ला-संसद गोंधळ**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सुरू असलेला गदारोळ थांबून कामकाज सुरळीतपणे व्हावं यासाठी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी काल संसद भवनात विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांची बैठक घेतली. सभागृहाचं कामकाज सुरळीतपणे सुरू ठेवण्यासाठी सहकार्य करण्याची विनंती त्यांनी यावेळी सदस्यांना केली. त्यावर सर्व नेत्यांनी सहमती दर्शवली. या बैठकीला काँग्रेसचे गौरव गोगोई, टीएमसीचे कल्याण बॅनर्जी, टीडीपीचे लवू श्री कृष्ण देवरायालू, डीएमकेचे टी आर बालू, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, समाजवादी पक्षाचे धर्मेंद्र यादव, शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत आणि अन्य नेते उपस्थित होते.

दरम्यान, देशानं संविधान स्वीकारल्याच्या घटनेला 75 वर्ष होत आहेत; त्या पार्श्वभूमीवर या महिन्याच्या 13 आणि 14 तारखेला लोकसभेत, तर, 16 आणि 17 तारखेला राज्यसभेत, संविधानाच्या विषयावर विशेष चर्चा होईल, असं, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी काल माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**संसद कामकाज**

तत्पूर्वी अदानी समूहावरील लाचखोरीचे आरोप आणि उत्तर प्रदेशातील संभल इथे झालेला हिंसाचार यांसह विविध मुद्यांवर विरोधकांनी कालही गदारोळ केला. त्यामुळे लोकसभा आणि राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**मोहोळ-राज्यसभा**

भारत जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख विमान बाजारपेठांपैकी एक असून, देशांतर्गत विमान वाहतुकीत भारत जगातील तिसरी सर्वात मोठी विमान वाहतूक बाजारपेठ बनली आहे, अशी माहिती नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल राज्यसभेत एका लेखी उत्तरात दिली. उडान योजनेचा विस्तार करण्याचं सरकारच्या प्रस्तावाधीन असल्याचं मोहोळ यांनी म्हटलं आहे.

**भाजप-निरीक्षक**

राज्यात सत्ता स्थापनेसंदर्भातील घडामोडींना वेग आला असून विविध पक्षांच्या नेत्यांमध्ये भेटीगाठी आणि चर्चा सुरू आहेत. भाजपा विधिमंडळ गटनेता निवडीसाठी भाजपने गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. हे दोघेही आज राज्यात येणार आहेत; भारतीय जनता पार्टीच्या

विधिमंडळ पक्षाची बैठक, उद्या 4 डिसेंबरला होणार असून त्यानंतर मुख्यमंत्रीपदासाठीच्या नावाची औपचारिक घोषणा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, येत्या 5 तारखेला संध्याकाळी मुंबईतील आझाद मैदानावर शपथविधी सोहळा होईल असं भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतंच समाज माध्यमावरील संदेशाद्वारे सांगितलं आहे.

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्रीय दिव्यांग पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या 22 व्यक्ती आणि 11 संस्थांना हे पुरस्कार देण्यात येणार आहेत. यावेळी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांच्या हस्ते दिव्यांगांसाठीच्या अनेक कल्याणकारी उपक्रमांचा आरंभ करण्यात येईल.

**<u>उपराष्ट्रपती-मुंबई दौरा</u>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज राज्याच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर येत आहेत. मुंबईतील केंद्रीय कापूस तंत्रज्ञान आणि संशोधन संस्थेच्या शतकपूर्ती वर्षानिमित्त उभारण्यात येणाऱ्या शताब्दी स्तंभाच्या उद्घाटन सोहोळ्याला धनखड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**<u>शरद पवार-संमेलन</u>**

आगामी 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं स्वागताध्यक्षपद ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी स्वीकारलं आहे, अशी माहिती, सरहद संस्थेचे संजय नहार, मसापचे मिलिंद जोशी आणि संयोजन समितीचे डॉ. सतिश देसाई यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. पुढच्या वर्षी 21 ते 23 फेब्रुवारी या कालावधीत हे संमेलन दिल्लीत होणार आहे.

**<u>इफ्फी-मंदार कुलकर्णी</u>**

गोव्यात नुकताच झालेला 55वा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात इफ्फी अनेक अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरला. ऐकुया या विषयीचा एक वृत्तांत....

यं**दाचा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव म्हणजे फी वैशिष्ट्यपूर्ण ठरला ते त्यातल्या विषयांमुळे आणि गोष्टी सांगण्याच्या हाताळणीमुळे. रशिया युक्रेन युद्ध इसराइल पॅलेस्टाईन युद्ध अनेक देशांमधली यादवी यांच्यामुळे होत असलेली एक प्रकारची वाताहत पडद्यावर दिसलीच, पण तंत्रज्ञानामुळे, अर्थकारणामुळे, समाज माध्यमांमुळे नात्यांमध्ये पडत असलेलं अंतरही चित्रकर्मिणी टिपलं नसतं तरच नवल. सर्वोत्कृष्ट चित्रपट मिळवलेल्या लिथुवानियाच्या टॉक्सिक या चित्रपटाने अर्थव्यवस्थेतल्या मंदीच्या पार्श्वभूमीवर स्वतःचा शोध घेणाऱ्या दोन मैत्रिणींची कथा दाखवली, तर बॉगडांन मूरेसानू यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळवून देणाऱ्या न्यू इयर दॅट नेव्हर गेम या रोमानियाच्या चित्रपटाने विशिष्ट विचारसरणीच्या अतिरेकामुळे समाजातल्या वेगवेगळ्या स्तरावरच्या नागरिकांची कशी ससेहोलपट होते हे दाखवलं. सोफी डेरास्पे यांचा शेफर्ड, ईसीआर बॅलिंका यांचा आयएम नेव्हेका, जॉर्ज सिखा रुलित्झ यांचा पॅनोप्टिकॉन अशा अनेक चित्रपटांमध्ये व्यक्तिरेखांचा स्वतःच्या अस्तित्वाचा, स्वत्वाचा शोध होता. पीयर्स, डेप लवर्स, हैप्पी हॉलिडेज, द वेलिंग असे चित्रपट रसिकांची दाद मिळवून गेले. सुरुवात मध्य शेवट अशा चौकटी भेदत चित्र कर्मी कथनाच्या वेगवेगळ्या शक्यता आजमावून पहात असल्याचं यंदाच्या चित्रपटांमधून दिसलं. एआर रहमान यांचयापासून रणबिर कपूर पर्यंत अनेक दिग्गजांनी हजेरी लावत चित्रपटांच्या वेगवेगळ्या पैलूंविषयी गंभीरपणे केलेली चर्चा इफ्फीचं महत्त्व यंदा अधोरेखित करून गेली. आकाशवाणी बातम्यांसाठी मंदार कुलकर्णी पुणे.**

**<u>रब्बी-पेरणी क्षेत्र</u>**

राज्यात झालेल्या चांगल्या पावसामुळे गतवर्षीपेक्षा रब्बी हंगामातील पेरणीच्या क्षेत्रात सुमारे दीडपटीने वाढ झाली आहे. ज्वारी, गहू, मकाच्या पेरणी क्षेत्राच्या वाढीबरोबरच यंदा तेलबियांच्या पेरणीचं क्षेत्र वाढलं आहे. त्यामुळे या रब्बी हंगामात, आधीच्या सरासरी 54 लाख हेक्टर क्षेत्रावरून या वर्षी सरासरी 60 लाख हेक्टरवर पेरण्या होण्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

**रब्बीपीक विमा**

रब्बी हंगामातील पिकांसाठीही एक रुपयात पीक विमा उपलब्ध करून देण्यात आला आहे. पीक विमा काढण्यासाठी 15 डिसेंबर ही अंतिम मुदत असून, राज्यात आतापर्यंत 18 लाख 79 हजार 822अर्ज आले आहेत. यातून 13 लाख 37 हजार 336हेक्टरवरील पिकांचं क्षेत्र विमा संरक्षित झालं आहे. परभणी जिल्ह्यातून सर्वाधिक, 2 लाख 74 हजार अर्ज आले आहेत. पुणे विभागातून 2 लाख 42 हजार 597तर ठाणे आणि पालघर जिल्ह्यातून एकही अर्ज आला नसल्याचं, कृषी विभागाच्या आकडेवारीवरून स्पष्ट झालं आहे.

**शरणागती-गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवादी दर वर्षी 2 ते 8 डिसेंबर दरम्यान पीएलजीए म्हणजे पीपल्स लिबरेशन गुरील्ला आर्मी सप्ताह साजरा करतात. या सप्ताहाच्या कालच्या पहिल्याच दिवशी भामरागड दलमची सदस्य तारा उर्फ शारदा उर्फ ज्योती दस्सा कुळमेथे या नक्षल महिलेने पोलिसांपुढे शरणागती पत्करली. अनेक गुन्ह्यात तिचा सहभाग होता. राज्य शासनाने तिच्यावर 2 लाख रुपयांचं बक्षीसही जाहीर केलं होतं. दरम्यान 2005 मध्ये आत्मसमर्पण योजना सुरु झाल्यापासून आतापर्यंत 678 नक्षल्यांनी पोलिसांपुढे शरणागती पत्करली आहे. नक्षल्यांनी हिंसेचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात यावं असं आवाहन पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी केलं आहे.

**विसर्ग-सातारा**

सांगली पाटबंधारे मंडळच्या मागणीनुसार कोयना धरणातून आज सकाळी 10 वाजता विद्युत गृहाचं एक युनिट सुरू करण्यात येणार आहे. यामुळे 1 हजार 50 क्यूसेक विसर्ग नदीपात्रात होणार आहे. त्यामुळे नदीकाठावरील ग्रामस्थांनी योग्य ती काळजी घ्यावी असं आवाहन धरण व्यस्थापनानं केलं आहे.

**हवामान-परभणी, सिंधुदुर्ग, चंद्रपूर**

फेंजल वादळाचा प्रभाव आणि परिणाम राज्यातही दिसून येत आहे. परभणी, सिंधुदुर्ग, चंद्रपूर जिल्ह्यात ढगाळ वातावरण असून, परभणी आणि आसपासच्या काही भागात काल जोरदार पाऊस पडला. ढगाळ वातावरण आणि पावसामुळे हरभरा, कापूस आणि तूर पिकांवर अळीचा प्रादुर्भाव होत आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात ढगाळ हवामानामुळे तापमानात काहीशी वाढ झाली. दरम्यान, सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या किनारपट्टीवर दरवर्षीप्रमाणे यंदाही सीगल पक्ष्यांचं आगमन झालं आहे. युरोपातून हजारो किलोमीटरचा प्रवास करून हे परदेशी पाहुणे मालवण, देवबाग, भोगवे आदी समुद्रकिनाऱ्यावर दाखल झाले आहेत. पुढचे साधारण दोन तीन महिने या पक्षांचा मुक्काम सिंधुदुर्गच्या किनारपट्टीवर असेल.

**हवामान**

येत्या 24 तासात राज्याच्या सर्वच विभागांमध्ये तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.